International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.3 Jan–Feb- 2022

# आधुनिक काळात स्त्री मुक्तीसाठी झालेले प्रयत्न

डॉ.माया बी. मसराम
शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय गडचांदूर जि.चंद्रपूर 442908
mayagondane1972@gmail.com

**सारांश**

. एकोणिसाव्या शतकात भारतीय स्त्री जीवनाच्या दृष्टीने नवीन पर्वाला सुरुवात झाली. दीर्घ काळाच्या मध्ययुगीन अंधाऱ्या जीवनातून बाहेर येण्याची संधी स्त्रियांना मिळाली शिक्षणाच्या निमित्ताने स्त्रीला घराबाहेर पडण्याची संधी मिळाली आणि स्त्रियांचे व्यक्तिमत्व बदलण्यास सुरुवात झाली. समाजाचाही स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हळूहळू बदलू लागला समाज जीवनातले वेगवेगळ्या क्षेत्रातील दरवाजेही स्त्रियांसाठी उघडायला सुरुवात झाली. परंपरागत चालीरीती स्त्रियांना अनेक बंधनात जखडून ठेवले होते. त्याना बंधनातून मुक्त करण्यासाठी अनेक सुधारकांनी पुढाकार घेतला. त्यात राजाराम मोहन रॉय, केशव धोंडो कर्वे, आगरकर, सावित्रीबाई फुले, ज्योतिराव फुले, यांचे फार मोठे योगदान आहे. ज्योतिराव फुले यांनी मनामध्ये एक गाठ बांधली ती म्हणजे स्त्री शिक्षणाची. त्यानी स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी मुलींची शाळा उघडून आपल्या पत्नीला शिक्षिका करून त्यांनी स्त्रीयांसाठी शिक्षणाची दारे उघडी करून दिली. जसजशी स्त्री प्रगती करीत पुढे सरकत गेली, तसतसा स्त्रीलाच आपल्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांचा अनुभव यायला लागला. आत्मनिष्ठेची जाणीव व्हायला लागली. स्वतःकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू लागला. स्वतः मध्ये किती बळ आहे याची जाणीव होऊ लागली. परावलंबना विषयी त्या हळूहळू जागृत होऊ लागल्या. अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याचे सामर्थ्य तिच्यामध्ये निर्माण होऊ लागले 1857 च्या स्वातंत्र्य उठावानंतर अनेक नवीन सुधारणा झाल्याने समाज जीवनाला आधुनिकतेचा स्पर्श झाला. शिक्षणाच्या योगाने अज्ञानाची जाणीव होऊन ज्ञानाची ओढ लागली. 1950 मध्ये स्वतंत्र भारताने प्रजासत्ताक राज्य पद्धतीचा स्वीकार केला. 1952 मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या स्त्रियानी विविध क्षेत्रात पदार्पण करून आपले कर्तृत्व सिद्ध केले. विजयालक्ष्मी पंडित या स्वतंत्र भारताच्या वकील म्हणून रशियाला गेल्या. राजकुमारी अमृत कौर या भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात आरोग्य मंत्री झाल्या.

इंग्रज राजवटीने अनेक सुधारणा केल्याने नवे वातावरण, आधुनिक शिक्षण, ब्रिटिशांचे प्रगत जीवन इत्यादी चा परिणाम समाजजीवनावर झाला लोक शिक्षणाकडे आकर्षित होऊ लागले. इंग्रजी शिक्षण आणि नोकरीच्या नवीन संधी प्राप्त झाल्या लोकांच्या मनोरचनेत बदल होऊ लागला. दीर्घकाळ कोंडलेले जीवन जगणाऱ्या अन्यायानी, रूढीनी हैराण झालेल्या, अज्ञानात खितपत पडलेल्या, स्त्रियांना मुक्त करण्याचे प्रयत्न सुरू झाले. ब्रिटिश प्रशासनालाही स्त्रियांची दुरावस्था, त्यातही सती सारखी अमानुष चाल भयंकर वाटत होती. स्त्रियांवर होणारी शक्ती

कमी करून स्त्रियांना वाचविण्यासाठी धडपड, प्रशासकीय पातळीवर सुरू झाली होती. राजा राजाराम मोहन रॉय यांनी सती प्रथेविरुद्ध आंदोलन उभे करून सती बंदी कायदा अस्तित्वात येण्यास परिश्रम घेतले. या सर्वांचा परिणाम स्त्रीविषयक समाजाचा दृष्टिकोन बदलण्यास कारणीभूत ठरला.

**मुख्य शब्द** – शिक्षण, मैत्रीय, दर्पण, स्त्री शिक्षिका, व्रत-वैकल्ये, बालविवाह, केशवपना, सत्यशोधक

**उद्दिष्टे**

1. समाज सुधारकांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी कोणते प्रयत्न केले ते जाणून घेणे.

2. स्त्री जागृतीसाठी झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

3. सामाजिक प्रथांमुळे स्त्रियांच्या विकासाचा मार्ग कसा बंद होतो हे जाणून घेणे.

4. सामाजिक व सांस्कृतिक बंधनात अडकलेल्या स्त्रियांची माहिती घेणे.

**प्रस्तावना**

कोणत्याही समाजातील जीवनमान काळानुसार बदलत असतोच. जुन्या कल्पना मागे पडते, नवीन कल्पना पुढे येऊन जीवनात बदल घडून येतो. परंतु ही प्रक्रिया फार मंद गतीची असते. तसेच निसर्गक्रमानुसार घडत जाणारी असते. परंतु एखाद्या वेळेस एखादी घटना इतकी प्रभावी ठरते की, पुढील बदलांच्या प्रक्रियेला नवे वळण देऊन होणाऱ्या बदलांना नवी गती प्राप्त होते.परिणामी सामाजिक परिस्थितीच्या परिवर्तनाला सुरुवात होते. उत्तर पेशवाईच्या काळात अस्थिर राजकीय परिस्थिती, मोठ्या प्रमाणात जातिभेद, प्रभावी नेतृत्वाचा अभाव त्यामुळे परिस्थितीवर कोणाचेच नियंत्रण नसल्याने आमजनतेची आणि स्त्रीयांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होत होती. सर्वात जास्त कनिष्ठ जातीचे लोक आणि स्त्रियायांचे मोठ्या प्रमाणात शोषण होत होते. सामाजिक आणि धार्मिक बंधनानी सर्वसामान्य समाजातील लोक त्रस्त झाले होते. संस्कृती पुर्व काळात असणाऱ्याचे ठिकाण आणि कंदमुळे शोधतांना अग्नीला माणसाळवताना पुरुष आणि स्त्री यांची श्रमविभागणी काय होती याची आपण कल्पना करू शकतो. शिकारीला पुरुष जात असताना स्त्रिया घरची कामे करून मुलांचा सांभाळ करायची ही व्यवस्था बऱ्याच वर्षापर्यंत कायम होती. स्त्रीने बौद्धिक शिक्षण घेणे हे कोणत्याही समाजाला मान्य नव्हते. 1933 मध्ये भारतातील पहिल्या स्त्री शास्त्रज्ञ कमला सोहोनींना बंगळूरूच्या पदव्युत्तर शिक्षण संस्थेत प्रवेश घेण्यासाठी नाकारण्यात आला होता. प्राचीन काळात मानवावर मोठ्याप्रमाणात धर्माचा प्रभाव असल्याने प्रत्येक मानव भीतीपोटी ईश्वराची संकल्पना मान्य करीत होता. कारण हे त्याचे अज्ञान होते. वेदातील कित्येक ऋचा स्त्रियांनी रचलेल्या होत्या. लोपामुद्रा, गार्गी, मैत्रीय या स्त्रियांचा थोडाफार इतिहास आहे. मैत्रीय यांची अध्यात्मिक क्षेत्रातील प्रगल्भता एवढी होती की, सांसारिक वैभवा ऐवजी आत्मिक विज्ञानाला तिने सर्वस्व मानले होते. गार्गीचा तत्वज्ञानाच्या क्षेत्रात फार मोठा प्रभाव होता. त्यामुळे जनकाने ब्रह्मयज्ञाच्या परिषदेला तिला सन्मानाने आमंत्रण दिले होते.1832 मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण नावाचे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले. त्यांनी आपल्या सुधारणावादी विचारांचा प्रसार करण्यासाठी या वृत्तपत्राचा वापर केला. बालविवाह, सतीप्रथा, स्त्रियांवर होणारे अन्याय या विरोधात त्यांनी समाज जागृती केली. गोपाळ हरी देशमुख यांनी सुद्धा आपल्या शतपत्रामधून स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. पुरुषांना पुनर्विवाहाची परवानगी असेल तर स्त्रियांनाही पुनर्विवाहाची परवानगी असली पाहिजे. असे लोक हितवादी यांचे म्हणणे होते. त्यांनी केशवपन करण्याच्या प्रथेवर कडाडून टीका केली. घटस्फोट घ्यायचा असेल तर तो पती-पत्नीच्या

सहमतीने घेतला जावा. पती पत्नीचा मानशिक व शारीरिक छळ करीत असेल तर तिने पतीपासून वेगळे राहावे. आणि पतीने तिला पोटगी दिली पाहिजे. असा विचार लोकहीतवादी यांनी मांडला. वृद्धांनी कुमारीकांशी विवाह करू नये अशी आग्रहाची मागणी करणारे विचार रानडे यांनी मांडलेले दिसून येते.

गोपाळ गणेश आगरकरांनी इसवीसन 1888 मध्ये सुधारक वर्तमानपत्र काढून स्त्री जीवनात सुधारणा घडवून आणले. त्यांनी बालविवाहाची चाल कायद्याने बंद व्हावी म्हणून प्रयत्न केले. स्वयंवर पद्धतीने म्हणजे स्त्रियांच्या स्वइच्छेने विवाह व्हावा असा त्यांचा आग्रह होता. महात्मा ज्योतिराव फुले यांचे क्रांतिकारीकार्य स्त्रियांच्या आत्मसन्मानाला जागृत करणारे आणि तत्कालीन स्त्री साहीत्याला प्रेरणा देणारे आहे. त्यांनी इसवीसन 1848 मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्या शाळेत स्त्री शिक्षिका मिळत नसल्यामुळे महात्मा फुले यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई यांना शिक्षित करून शिक्षिका बनवले. स्त्रियांनी शिक्षण घेणे म्हणजे धर्म बुडविणे होय, अनैतिकता व सामाजिक आजाराला निमंत्रण देणे होते. असा दांभिक प्रचार तत्कालीन सनातनी वर्गाने केला त्यांनी सावित्रीबाईंना दगड , सेन, चिखल फेकून मारली. ज्योतीरावांच्या वडीलांवर दडपण आणून त्यांना घराबाहेर काढण्यास भाग पाडले.पण ज्योतीरावांनी सर्व विरोधकांवर मात करून मुलीसाठी आणखी शाळा काढल्या सावित्रीच्या शिक्षणाने आणि अनेक स्त्रियांमध्ये आत्मभान जागृत व्हायला लागला. शिक्षण मिळाल्याने स्त्रियात कशी जागृती येते याचे प्रत्यंतर ज्योतिरावांच्या शाळेत शिकणारी मुक्ता नावाच्या मुलीने वयाच्या अकराव्या वर्षी लिहिलेल्या (इ. स.1855)एका निबंधातून मिळते हा निबंध ज्ञानोदय पत्रामध्ये छापला गेला त्यात ती म्हणते ब्राह्मण लोक म्हणतात कि इतर जातींनी वेद वाचू नये याचा अर्थ आम्हास धर्मपुस्तक नाही. इंग्रजी राज्यापूर्वी उच्चवर्णीय लोकांचा अपराध करणाऱ्या महार मांगाचे डोके मारीत असत. या अस्पृश्य लोकांना सार्वजनिक बाजार हाट, मंदिर, पाण्याचे ठिकाण, या ठिकाणी प्रवेश नव्हता तो आता मिळाला. या देशातील स्त्रीमुक्तीचा हा पहिला उद्धार होता. महात्मा फुले यांनी इसवीसन 1863 मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून मोठमोठी पोस्टर गावभर लावली. ज्या विध्वानवर बलात्कार झाल्याने त्या गर्भवती राहिल्यास त्यांनी या गृहात येऊन आपल्या अपत्यांना जन्म द्यावा त्यांची नावे जाहीर होणार नाही. जाताना त्यांनी मुलं घेऊन जावे किंवा येथे ठेवून जावे. असा अनाथ मुलांच्या राहण्याची सोय ज्योतिरावांनी केली होती. विधवांच्या केशवपनाला विरोध करण्यासाठी त्यांनी न्हाव्याचा एक दिवसाचा संप घडवून आणला. एखाद्या स्त्रीला अपत्यप्राप्ती होत नसेल तर पुरुषांनी दुसरा विवाह करावा. मग स्त्रीनेही दुसरा विवाह का करू नये असा प्रश्न त्यांनी केला अशा अनेक प्रयत्नांतून ज्योतिबा फुले यांनी स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार केला. एकोणिसाव्या शतकात एकूण 39 विधवांचे पुनर्विवाह ब्राह्मण समाजात घडवून आणले. हा विवाह करण्याचे धाडस धोंडो केशव कर्वे यांनी 11 मार्च 1893 रोजी शारदा सदनातील पहिली बालविधवा गोदूबाई जोशी यांच्याबरोबर पुनर्विवाह केला. मनावरील दडपण कमी होऊन आपल्या मनातील विवाहाची इच्छा व्यक्त करण्याचा धीट पणा हळू-हळू स्त्रियांमध्ये येत होता. विध्वांच्या नशिबी जे विपरीत जीवन येत होते याचे मूळ त्यांचे अजाणते वयात लग्न होईल त्या बाल विवाहात होती. तसेच विध्वांनच्या नशिबी त्यांचे दुःख वाढवणारी दृष्ट रूढी होती. ती केशवपनाची हिंदू समाजातील अनिष्ट चालीरीतींचा विचार करण्यासाठी सरकारने 1887 मध्ये वर्डस्वर्थ कमिटी नेमली होती. त्यानिमित्ताने इंदु प्रकाश मध्ये एका वाचकांने पत्र लिहून केशवपना विषयी काही सूचना दिल्या होत्या. धर्मावर परिणाम होणार नाही असा कायदा करावा. कोणत्याही स्त्रीचे केशवपन तिच्या इच्छेविरुद्ध करू नये. पुनर्विवाह कायद्याने समाजाच्या समजुतींना, रूढींना जेवढा धक्का दिला, तेवढा नोंदणी कायद्याने दिला नाही. विवाह प्रसंगी वधूचे वय नेमके किती असावे बालविवाह योग्य नाही, अशी कारणे बाल विवाहात होती. त्यामुळे या विषयाकडे समाजाचे लक्ष वेधले गेले. त्यातूनच संमती वयाच्या कायद्याचा विचार पुढे आला. आणि समाजात एक मोठे वादळ निर्माण झाले. परिणामी समाजात सामाजिक परिवर्तनाची सुरुवात झाली.

प्राचीन भारतीय मनुस्मृतीत, मुस्लिम धर्मामध्ये दहा वर्षापेक्षा कमी वयाच्या पत्नीबरोबर समागम हा गुन्हा होता, कंपनी सरकारच्या राजवटीत इंडियन लॉ तयार करताना अल्पवयीन पत्नीशी समागम हा गुन्हा मानला नव्हता. परंतु 1846 मध्ये नेमलेल्या कमिशनच्या मनात एकंदर स्त्री जीवनाविषयी नवीन विचार आले बालविवाह स्त्रिवर अन्याय करणारा आहे. त्यातूनच अनेक प्रश्न निर्माण झाले. बालविवाह होता कामा नये याची जाणीव झाली. सुधारणा वादाच्या दृष्टीने समाजात अनुकूलता निर्माण होत गेली. स्त्रियांनी सासरी कसे वागावे, स्त्रियांचे शिक्षणात विषय कोणते असावेत, स्त्रीयांना शिकविल्या शिवाय समाजात सुधारणा कशी होणार, व्रत-वैकल्ये यांच्याकडे स्त्रीयांनी कसे बघावे, यासारख्या विषयावरील लेखातून स्त्रियांचे उद्बोधन साधले जाई. 19 व्या शतकात स्त्रीयांसाठी शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांची निर्मिती होण्यास सुरुवात झाली. या कार्यातूनच स्त्रियांच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळाली. सामाजिक कार्याची स्त्रियांना संधी उपलब्ध झाली. स्त्रियांचा बौद्धिक स्तर उंचावला. आणि सांस्कृतिक जीवनात स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक कार्याला मनापासून साथ दिली. बालहत्या प्रतिबंधक गृहातील स्त्रियांची बाळंतपणे करणे, स्त्रियांनी संघटित व्हावे म्हणून स्त्रियांसाठी हळदी-कुंकू समारंभ आयोजित करणे, स्त्रियांच्या प्रश्नावर चर्चा करणे, अशा अनेक गोष्टींमध्ये सावित्रीबाईंनी उत्साहाने काम केले, म्हणूनच 1890 मध्ये महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाचे नेतृत्व सावित्रीबाईंनी स्वीकारले. आणि त्यात त्यांना यशही मिळाले. शिक्षणाने स्त्रीचे व्यक्तिमत्व कसे तयार होऊ शकते. याचा सावित्रीबाईंनी एक नमुना होत्या.

पितृसत्ताक पद्धतीतील प्रतीकात्मक व्यवस्थेने बाजूला टाकले जाते ते म्हणजे स्त्रीला, असे सुप्रसिद्ध बल्गेरियन फ्रेंच भाषा वैज्ञानिक जूलियाक्रिस्ती हिच्या मते (1941) पितृसत्ताक पद्धती स्त्रियांना मुख्य प्रवाहातून दोन टोकाच्या भूमिकांकडे लोटते जिच्याबद्दल समाजाला आदर वाटतो ती देवता, पतिव्रता, सौभाग्यवती व माता ही भूमिका तर दुसऱ्या टोकाला समाजामध्ये ज्यांना किंमत नाही अशा परितक्त्या, वेश्या, कुमारीमाता, विधवा, प्रौढ कुमारिका अशा भूमिका. स्त्री ही एक मानव आहे या स्वरूपाचा विचारच समाजात दिसत नाही. स्त्रीची भूमिका पुरुषाशी असलेल्या संबंधावरून ठरते. याचा वास्तविकतेशी काही संबंध नाही. असे समाज सुधारणावादी लोकांना वाटते. जगातील कोणत्याही धर्मग्रंथाने स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचे स्थान दिले नाही. दहेज ऑफ एव्हरी वीमेन आज मॅन (बायबल) नस्त्री स्वातंत्र्य अर्हती (मनुस्मृति ) म्हणजे स्त्री ही दुय्यम व परावलंबी आहे हे धर्मग्रंथ सांगतो. भारतीय परंपरेत स्त्री ही फक्त उपभोगाचे साधन समजले गेली. पुरुषाला संसारातून मुक्त होऊन मोक्षाची साधना करायची असेल तर स्त्री संघाचा त्याग केला पाहिजे. स्त्रीचा विचार मानव म्हणून होत नाही. शेकडो वर्षापासून स्त्रिचा जन्म हा पुनर्जन्माचे पाप आहे असे समजून तिच्याकडे तुच्छ नजरेने पाहिले जात होते. आणि स्त्री ही स्वतःला कमी लेखू लागली होती. स्वाभिमान, कोंडमारा, यशस्वी इच्छा, पूर्ण आत्मविश्वास, स्वातंत्र्य, परावलंबन या माणसाच्या नैसर्गिक इच्छा मारल्यावर माणसाचा कोंडमारा होतो. आणि स्त्रिया याच्या बळी ठरल्या होत्या. प्राचीन काळापासून तर आजपर्यंत स्त्रियांच्या जलवंत प्रश्नांना वाचा फोडण्याचे सातत्याने प्रयत्न सुरू आहे. हे जरी खरे असले तरी आजही अनेक गंभीर समस्या भारतामध्ये स्त्रियांच्या आहेत. रुढी-परंपरांचा पगडा प्रत्येक धर्मातील खाजगी जीवनात नियंत्रण करणारे कायदे, आपल्याला आज दिसून येतात. आधुनिक काळात स्त्रियांचे प्रश्न संपले असे नाही. आधुनिक काळात स्त्रियांचे प्रश्न हे वेगळ्या पद्धतीने निर्माण झालेले आपल्याला दिसून येतात.

**निष्कर्ष**

19 शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झालेल्या प्रबोधन युगाने परंपरेवरची पुटे खरवडण्यास सुरुवात केल्यानंतर स्त्री उद्धाराचा विचार आणि कृती यांना गती मिळाली. राजाराम मोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा ज्योतिबा फुले, लोकहितवादी, गोपाळ हरी देशमुख,गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ती रानडे, महर्षी धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, यासारख्या समाजसुधारकांनी सतीबंदी, बालविवाह प्रतिबंध, विधवा-पुनर्विवाह, केशवपनाला विरोध, स्त्रीशिक्षण, विधवाश्रम इत्यादींच्या संदर्भात 20 शतकाच्या मध्यापर्यंत अनेक वैचारिक व कृतिशील चळवळी उभारल्या होत्या. 1848 मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात स्त्रियांसाठी पहिली शाळा महात्मा ज्योतिराव फुले यांनी काढली. लोक निर्णयाची पर्वा न करता, लोकांच्या छळाला न भीता निर्भयपणे सावित्रीबाईनी स्त्रियांच्या शिक्षणाचा वसा घेतला होता. सावित्रीबाई फुले भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका, स्त्री मुक्ती चळवळीच्या पहिल्या नेत्या बनल्या होत्या. त्यांच्या शिक्षणाने स्त्रियांमधील पशुत्व जीवन नष्ट व्हायला लागले होते. ताराबाई शिंदे या प्रख्यात स्त्रीवादी चा जन्म एक सधन कुटुंबात झाला. ताराबाई शिंदे यांनी सत्यशोधक विचार सरणीशी संबंधित शिक्षण दिले. त्यांना मराठी, इंग्रजी, संस्कृत, हिंदी भाषा अवगत होत्या. ताराबाईचा जेव्हा विवाह झाला त्यावेळी त्यांनी परंपरागत प्रथांना नाकारले होते. 1882 मध्ये त्यांनी लिहिलेला स्त्री-पुरुष तुलना हा निबंध स्त्री-मुक्ती विचारसरणीची एक क्रांतिकारी सुरुवातच होती. या निबंधातून स्त्रियांच्या वेदना व दुःखाला वाचा फोडण्याचे कार्य त्यांनी केले.

स्त्री ही शक्ती असून तिची अस्मिता केवळ पुरुषांच्या संदर्भात मर्यादित नाही. तिचे स्वातंत्र्य समाज घडणीसाठी आवश्यक आहे. ही जाणीव महात्मा गांधी ने करून दिली. 1909 व 1919 च्या राजकीय सुधारणात स्त्रियांना मर्यादित मतदानाचा अधिकार प्राप्त झाला होता. 1930 मिठाचा सत्याग्रह, 1932 ची सविनय कायदेभंग, चळवळ यात महात्मा गांधीजींच्या प्रेरणेने हजारो स्त्रियां प्रथमच सहभागी झाल्या. मोर्चे, लाठीमार, तुरुंगवास, हाल-अपेष्टा यांना तोंड देण्याचे सामर्थ्य याच काळात स्त्रियांमध्ये निर्माण झाले होते. त्यामुळे स्त्री शिक्षणाला चालना मिळाली. सरोजनी नायडू, ऑनी बेझंट यांनी राष्ट्रीय चळवळ व होमरूल चळवळीचे नेतृत्व केले. 1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. 1950 मध्ये घटना अमलात आली. घटनेमध्ये सार्वभौम व प्रजासत्ताकाची स्थापना, यामुळे स्त्रियांचा घटनात्मक समान नागरिकत्वाचा दर्जा व सर्वांना समान संधी मिळाली. 19 शतकात स्त्री जीवनात क्रांतिकारी बदल झाले. तंत्रज्ञानाच्या प्रगतीने स्त्री पुरुष हा भेद कमी होऊ लागला. व्यक्तिवादी विचारसरणीमुळे कुटुंब व संस्कृती टिकणार की नाही अशी भीती निर्माण झाली आहे. नवीन स्त्री मुक्ती लाटेत स्त्रियांनी स्त्रियांवरचे अत्याचार, स्त्रियांचा व्यापार, सौंदर्यवर्धक शस्त्रक्रिया, माध्यमातील स्त्रियांचे अश्लील चित्रण, योनी अंगच्छेदन याविरुद्ध आवाज उठविण्यावर अधिक भर दिला असून जगभरातील स्त्रियांनी एकत्र येऊन आपल्या उद्धारासाठी लढावे अशी जाणीव निर्माण करून दिली आहे.

पाश्चात्त्य मुक्ती विचारात पुरुषा विरोधी स्त्रियांच्या व्यक्तीमत्वाची स्थापना, सर्व प्रकारचे स्वातंत्र्य व समानता या गोष्टींवर जास्त भर दिला गेला. भारतात स्त्री विरुद्ध पुरुष अशी भावना नसून स्त्रियांचा उद्धार व्हावा यासाठी सर्वात जास्त पुरुषांनी पुढाकार घेतला आहे. भारतात कुटुंब संस्थेला महत्त्व असल्याने, पिता, भाऊ, पत्नी, मामा, काका, इत्यादी नातेसंबंधातून स्त्री विकासाचा मार्ग मोकळे होतात. दुर्गा, काली, चंडीका, देवता स्त्रीरूप असल्या तरी प्राचीन काळापासून भारतातील स्त्री शोषित व अन्यायग्रस्त जीवन जगत होती. वेदकाळात गार्गी, मैत्रीय, सुलभा या

स्त्रिया ब्राह्मणवादीनी होत्या. इतिहासकाळात जिजाबाई, ताराबाई, अहिल्याबाई, चांदबीबी, राणी लक्ष्मीबाई, इ. राजघराण्यातील स्त्रियांनी लढाया केल्या होत्या. मध्ययुगीन काळात मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा या स्त्रियांनी आपल्या अभंगातून स्त्रियांना नवी चेतना दिली. हे जरी खरे असले तरी मनुवादी विचारसरणीने येथील स्त्रीला दुर्बल बनवून परावलंबी जीवन जगण्यास भाग पाडले. अज्ञान अंधकारात स्त्री पूर्णपणे डुबली होती. धर्मशास्त्राने स्त्रियांना अनेक बंधनात अडकवून ठेवले. तिच्यावर व्रत-वैकल्याचे ओझे, पाप-पुण्याशी जोडून शारीरिक कष्ट व उपवास तिच्यावर लादले. नवऱ्याच्या मृत्यूनंतर सती जाणे, बालवयात विवाह व मातृत्व, बालजरठ विवाह, विधवांचे केशवपन, शिक्षणाचा अभाव हे येथील स्त्रियांचे भोग होते. परंतु अनेक समाजसुधारकांच्या प्रयत्नाने आणि भारत स्वातंत्र्यानंतर घटनेने दिलेल्या संविधानिक अधिकार आणि येतील स्त्रियांच्या उध्दाराचा व मुक्तीचा मार्ग मोकळा झाला.

**संदर्भ ग्रंथ**

1) स्त्रियांची शतपत्रे डॉक्टर स्वाती कर्वे प्रतिमा प्रकाशन पुणे 411030

2) सावित्रीबाई फुले समग्र वांग्मय माळी मा. गो. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई

3) श्री विकासाच्या पाऊलखुणा स्वाती कर्वे प्रतिमा प्रकाशन पुणे 2003

4) महिला विकास एवं सशक्तीकरण - सारिका ठाकूर - कुलसचिव महात्मा गांधी चित्रकूट ग्रामोदय विश्वविद्यालय चित्रकूट जिल्हा सतना

5) समाज राजनीती और महिलाएं दशा और दिशा - स्वप्रिल सारस्वत - राधा पब्लिकेशन नई दिल्ली 110002

6) महिला कल्याण आणि विकास – प्रा. सौ.माधवी कवी - विद्या प्रकाशन नागपूर 440002

7) स्त्री पर्व - मंगला सामंत - सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ पुणे 411030